LIVE महाराष्ट्र 24

महाराष्ट्राचे निर्भीड, निःपक्ष आणि विश्वासार्ह दैनिक वृत्तपत्र • सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारिता

महाराष्ट्र | शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६

महाराष्ट्र

शिवतीर्थाच्या विकासासाठी 5 कोटी 75 लाखांचा निधी मंजूर!

शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीला एकनाथ शिंदेंचा तातडीने प्रतिसाद; काही तासांत शासन निर्णय जारी

LIVE MAHARASHTRA 24 | शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६



शिवतीर्थाच्या विकासासाठी ५ कोटी ७५ लाखांचा निधी मंजूर!

शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीला एकनाथ शिंदेंचा तातडीने प्रतिसाद; काही तासांत शासन निर्णय जारी सातारा : साताऱ्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या पोवई नाका येथील शिवतीर्थाच्या विकासासाठी राज्य शासनाने ५ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दरे येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शिवतीर्थाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत अवघ्या काही तासांत निधी मंजुरीचा शासन निर्णय जारी करण्यात आला. 'नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान' या योजनेंतर्गत सातारा नगरपरिषदेला हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून पोवई नाका येथील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याशी संबंधित अनुज्ञेय विकासकामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे शिवतीर्थाच्या विकासकामांना आता आर्थिक बळ मिळाले आहे. निधी मंजूर झाल्यानंतर सातारा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी शिवतीर्थावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच निधी मंजूर केल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी गटनेते अविनाश कदम, क्रीडा व सांस्कृतिक सभापती शंकर किर्दत, आरोग्य सभापती धनंजय जांभळे, नगरसेवक विजय देसाई, राजू गोरे, रविराज किर्दत, सुशांत महाजन, जयवंत भोसले, सुनीलकुमार भंडारी यांच्यासह शिवप्रेमी उपस्थित होते. शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण शिवतीर्थाच्या विकासासाठी ५ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याने साताऱ्यातील शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निधीमुळे शिवतीर्थाच्या विकासाला गती मिळणार असून साताऱ्याच्या ऐतिहासिक वैभवात आणखी भर पडणार असल्याची भावना नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र

झाडेच निसर्गाची खरी मशाल; वृक्षतोड थांबवा!



ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांचा सरकार आणि प्रशासनाला स्पष्ट संदेशप्रतिनिधी | सातारा"सरकार काय आभाळातून पडलंय का? तुम्ही-आम्हीच त्यांना निवडून देतो ना! आम्ही इतर कामांमध्ये बोलतो का? आमचा मुद्दा एवढाच आहे की, तुम्हाला कुठे दिवे लावायचे असतील, तर खुशाल लावा. मात्र, झाड हाच मुळात मूळ दिवा आहे, तीच खरी मशाल आहे. त्याला हात लावू नका!" अशा परखड शब्दांत ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी सरकार आणि प्रशासनाला वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून स्पष्ट संदेश दिला आहे.पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीसाठी सातत्याने आग्रही भूमिका घेणारे सयाजी शिंदे यांनी विकासकामांच्या नावाखाली होणाऱ्या वृक्षतोडीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही; मात्र विकासाच्या प्रक्रियेत निसर्गाचा आणि पर्यावरणाचा बळी दिला जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी विकासकामे करताना पर्यावरण रक्षणाची जबाबदारीही लक्षात घ्यावी, असे आवाहन त्यांच्या वक्तव्यातून अधोरेखित झाले आहे. रस्ते, दिवे आणि अन्य सुविधा निर्माण करताना जुन्या वृक्षांचे महत्त्व दुर्लक्षित करू नये, असा संदेशही त्यांनी दिला आहे.सयाजी शिंदे यांच्या या वक्तव्यामुळे वृक्षतोड आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, त्यांच्या भूमिकेची पर्यावरणप्रेमींकडून दखल घेतली जात आहे.

जलद वार्ता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर सह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ताज्या घडामोडी सर्वात आधी LIVE महाराष्ट्र २४ वर

आपत्कालीन हेल्पलाईन: पोलीस ११२ • रुग्णवाहिका १०८ • अग्निशामक १०१ महिला १०९१ • बाल १०९८

A4 DIGITAL E-PAPER FORMAT

संपर्क / जाहिरात: 9763477700 Developed with ❤ by Kliqueit